**रे.के.नं. ९३/२०२३**

**नि.क्र. ३३/क**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र.५** याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | **प्रकाश सुरेश बोरसे** |
| वय | - | **४३ वर्षे** |
| व्यवसाय | - | **पोलिस हवालदार ब क्र. १९१०** |
| राहणार | - | **न्हावाशेवा पोलिस स्टेशन** |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती शितल पवार यांच्यामार्फत...**

१. घटनेच्यावेळी मी न्हावाशेवा पोलिस ठाण्यात पोलीस हवालदार पदावर कार्यरत होतो. त्यावेळी ठाणे अंमलदार अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक श्री परचाके हे होते. त्यांनी सदर प्रकरणाच्या गुन्हांची नोंद केली. त्यानंतर सदर गुन्हांचा तपास माझेकडे सोपवला. माझेकडे तपास कामी प्रथम खबरची प्रत, घटनास्थळ पंचनामा, फिर्यादीचा जबाब इत्यादी कागदपत्रे मिळाली होती. मी तपासाअंतर्गत एकूण ६ साक्षीदारांचे जबाब नोंदवले होते. त्यानंतर मी आरोपीस नोटीस दिली होती. आता मला प्रकरणात दाखल त्या नोटीसची प्रत दाखवली त्यावर माझी व आरोपीची सही असून मजकूर बरोबर आहे. करिता सदर नोटीसच्या प्रतीला **निशाणी क्रमांक ३४/क** देण्यात येतो. त्यानंतर मी सदर गुन्ह्यात भा.द.वी. चे कलम ३८४ अंतर्गत कलमवाढी बाबत न्यायालयास पत्र लिहिले. तसेच आरोपींना नोटीस दिल्यानंतर ते हजर झाल्याने

त्याबाबतची पोचपावती त्यांना दिली होती. आता मला प्रकरणात दाखल त्या पोचपावतीची प्रत दाखवली. त्यावर माझी व आरोपीची सही असून मजकूर खरा व बरोबर आहे. करिता सदर पोचपावतीच्या प्रतिला निशाणी क्रमांक ३५ देण्यात येतो. त्यानंतर आरोपीस अटक न केल्याबाबतचा अहवाल न्यायालयास सादर केला. आता मला त्याबाबतचे प्रकरणात दाखल पत्र दाखवले त्यावर माझी सही असून मजकूर खरा व बरोबर आहे. करिता सदर पत्राला निशाणी क्रमांक ३६ देण्यात येते. त्यानंतर मी कलम वाढ केल्याने फिर्यादीचा पुरवणी जबाब दिनांक २४/०१/२०२३ रोजी घेतला. आता मला प्रकरणात दाखल तो पुरवणी जबाब दाखवला. त्यावर फिर्यादीची सही असून समक्ष म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे नमूद केला होता. करिता सदर पुरवणी जबाबाला निशाणी क्रमांक ३७ देण्यात येते. त्यानंतर मी दोषारोप पत्र दाखल केले व त्याबाबतची माहिती फिर्यादीला दिली होती. त्याबाबतचे पत्र प्रकरणात दाखल असून ते आता मला दाखवले. त्यावर माझी व फिर्यादीची सही असून मजकूर बरोबर आहे. करिता सदर पत्राला निशाणी क्रमांक ३८ देण्यात येते. माझे तपासात आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने मी दोषारोप पत्र दाखल केले. मी आरोपीस ओळखू शकतो तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**आरोपीच्या वकीलांनी उलटतपास घेण्यास वेळ मिळण्याचा अर्ज दाखल केला तो अर्ज मंजूर झाल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/-

**उरण,** **(एस. पी. वानखडे)**

दिनांक – ०२/०१/२०२६ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

न्यायालय क्र. २